नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ०९/०४/२०२६ (गुरूवार )**

## बनावट जात वैधता प्रमाणपत्र प्रकरणात ३ आरोपी अटक

**पोलीस स्टेशन पाचगाव** :— अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, नागपूर येथे दाखल तक्रारीच्या अनुषंगाने संपुर्ण महाराष्ट्रात अनुसुचित जमातीच्या राखीव जागांवर प्रवेश घेवुन त्याकरीता सादर केलेले जात वैधता प्रमाणपत्राबाबत सन २०२४ पासून चौकशी सुरू असून, सी.ई.टी. सेल महाराष्ट्र राज्यामार्फत प्राप्त यादीच्या आधारे संशयित प्रमाणपत्रांची पडताळणी करण्यात आली. तपासा दरम्यान काही अर्जदारांनी खोटे जात वैधता प्रमाणपत्र सादर करून शैक्षणिक संस्थांमध्ये प्रवेश घेतल्याचे निष्पन्न झाले आहे. सदर चौकशी मध्ये जात वैधता प्रमाणपत्र तयार करणारे रॅकेट असल्याचे समितीच्या निदर्शनास आले. बनावट जात वैधता प्रमाणपत्र तयार करुन अनुसुचित जमातीच्या विद्‌यार्थ्यांची फसवणुक होत असल्याची आणि बनावट जात वैधता प्रमाणपत्र तयार करुन मिळवुन देणे मोबदल्यात विद्‌यार्थ्यांकडुन रोख रक्कम घेवुन त्यांची आर्थिक पिळवणुक केली जात असल्याचे सुध्दा निषन्न झाले तसेच गोविंदराव वंजारी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी, सालई गोधनी, जि. नागपूर येथील काही संबंधित व्यक्तींनी बनावट प्रमाणपत्र तयार करण्यासाठी मदत केल्याची बाब चौकशीत समोर आली आहे. यामध्ये सहाय्यक प्राध्यापकांसह इतर काही व्यक्तींचा सहभाग असल्याची माहीती उघड झाली. नमुद प्रकरणी पोलीस निरीक्षक, पोलीस दक्षता पथक ,अनुसुचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, नागपुर यांच्या लेखी रिपोर्ट वरून दिनांक २८/०३/२०२६ रोजी पोलीस स्टेशन पाचगाव येथे ११ आरोपीविरूध्द कलम ३१८(४),३३८, ३३६(३),३४०(२),३(५) भा. न्या. सं. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

**पाचगाव पोलीसांनी मा. श्री हर्ष ए. पोद्दार ,पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा , श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्रीमती वृष्टी जैन, सहा पोलीस अधिक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी, उमरेड उपविभाग यांच्या मार्गदर्शनात सदर प्रकरणाचा जलद गतीने तपास करून एका विदयार्थीनीला अटक केली तसेच साखळी पुरावे जोडुन नमुद प्रकरणात अजुन २ दोन आरोपींना निष्पन्न करून दिनांक ०८/०४/२०२६ रोजी आरोपी क्रं १) मुकेश बिसनदेव चौबे, वय ४५ वर्ष ,रा. सबीना सोसायटी, प्लॉट नं. ३५, गोरेवाडा, नागपुर २) जगन्नाथ रामा शेरकुरे, वय २२ वर्ष ,रा. तास, ता. भिवापूर जि. नागपुर यांना अटक केली आहे. यातील आरोपी क्रं २ याने त्याच्या भावाचे बनावट जात वैधता प्रमाणपत्र हे आरोपी क्रं १ याच्या मदतीने तयार केल्याची माहीती पोलीसांना प्राप्त झाली आहे. सदर प्रकरणात पोलीस साखळी पुरावे जोडुन सखोल तपास करीत आहेत.**

## कोंढाळी पोलीसांच्या सतर्क रात्रगस्ती मुळे दुकान फोडणारे आरोपी तात्काळ निष्पन्न झाले

पोलीस स्टेशन कोंढाळी :— **कोंढाळी पोलीसांच्या सतर्क रात्रगस्ती मुळे दुकानफोडीचा गुन्हा तात्काळ उघड झाला.** दिनांक ०९/०४/२०२६ रोजी कोंढाळी पोलीस बाजारगाव परीसरात रात्रगस्त करीत असताना एका मोटार सायकलवर तीन इसम संशयितरीत्या येताना दिसले. त्यांना पोलीसांनी थांबण्याचा इशारा केला असता काही अंतरावर वाहन थांबवून अंधाराचे दिशेने पळ काढला. त्यामुळे त्यांच्यावरील संशय अधिक बळावल्याने पोलीसांनी शिताफीने पाठलाग करून त्यापैकी दोघांना ताब्यात घेतले. मिळुन आलेले दोघे **विधीसंघर्षग्रस्त बालक असल्याची माहिती प्राप्त झाली.** पळून गेलेल्या इसमांचे नाव विचारले असता त्यांनी **आरोपी नामे पंकज मोहन बांगरे, वय २२ वर्षे, रा. सुकळी, ता. हिंगणा** अशी माहिती प्राप्त झाली. विधीसंघर्षग्रस्त बालकांजवळ १) वेगवेगळया कंपनीचे सिगारेट पाकीटे, २) रोख रक्कम २४०/—रूपये ३) एक लोखंडी हातोडी हे साहीत्य मिळुन आले. पोलीसांनी **मुद्देमालाबाबत** सखोल आणि कौशल्यपुर्ण विचारपुस केली असता त्यांनी दुधाळा येथील एका पानठेल्याचा कुलुप तोडून चोरी करून आणल्याचे सांगितले. त्यानंतर त्यांना विश्वासात घेवून अधिक विचारपूस केली असता त्यांनी सांगितले की, काही दिवसा पुर्वी कोंढाळी परिसरात एक चोरी

केलेली आहे. नमुद प्रकरणी पोलीस स्टेशन कोंढाळी येथे कलम ३३१(४),३०५(अ) भान्यासं अन्वये गुन्हा नोंद केला आहे.

**पोलीसांनी १) वेगवेगळया कंपनीचे सिगारेट पाकीटे, २) रोख रक्कम २४०/—रूपये ३) एक लोखंडी हातोडी आणि ४) मोटरसायकल क्र. एम एच ३६/ए एस ४०२३ असा एकूण ८१,४०५/— रुपयांचा मुद्द्देमाल जप्त केला आहे.**

## पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे दाखल प्राणांकीत अपघाताबाबत..

**पोलीस स्टेशन कळमेश्र :—** दिनांक ०८/०४/२०२६ पाहटे रोजी गोंडखैरी शिवार येथे विजयकुमार नेपालसिंग यादव वय ३५ वर्ष रा. गुंटा रा. राजस्थान हा त्याचे ताब्यातील ट्रक क्रं. आर .जे. २३ जि. डी. ५२४५ मध्ये राखड भरून अकोलाकडे जात असतांना आरोपी ट्रक क्रं एम.एच.४४ यु ५५९० चा चालक वैभव संताराम दहीफडे, वय २५ वर्ष रा. परडी वैजनाथ जि. बीड याने आपले ताब्यतील ट्रक क्रं एम.एच.४४ यु ५५९० ही भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन अचानक ब्रेक मारल्याने मृतक याचे ताब्यातिल ट्रक क्रं. आर.जे. २३ जि.डी.५२४५ ही आरोपीचे ट्रक क्रं एम.एच.४४ यु ५५९० जावुन धडकली व ट्रक क्रं. आर.जे. २३ जि.डी.५२४५ चा चालक हा गंभीर जख्मी होवुन मरण पावला. सदर प्रकरणी पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे वैभव संताराम दहीफडे, वय २५ वर्ष रा. परडी वैजनाथ जि. बीड याचे विरूध्द कलम २८१,१२५(अ),१०६(१) भान्यासं सहकलम १८४ मो.वा.का अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला.

**दिनांक ०९/०४/२०२६ रोजी एका वृत्तपत्रात ओव्हरलोड ट्रकचा भिषण अपघात अशा शिर्षकाखाली बातमी प्रसीध्दी झाली आहे. तसेच त्यात ओव्हरलोड मुरूम वाहतुक करणाऱ्या ट्रकचा ताबा सुटल्याने अपघात झाल्याचे नमुद केले आहे. श्री पराग पोटे, उपविभागिय पोलीस अधिकारी काटोल, प्रभार सावनेर उपविभाग यांनी सदर घटनास्थळी भेट दिली असुन घटनास्थळ तसेच संबधीत दोन्ही वाहनाची प्रत्यक्ष पाहणी केली आहे. सदर ट्रक मध्ये मुरूम नसुन राखड आहे तसेच ट्रक ओव्हरलोड नसल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे.**

# अवैधरित्या ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळणाऱ्या १७ आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद.नरखेड पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन नरखेड** :— दिनांक ०८/०४/२०२६ रोजी नरखेड पोलीसांना गुप्त बातमीदारा मार्फत खात्रीशीर माहीती मिळाली की, मौजा बेलोना शेतशिवार येथे काही इसम ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीस घटनास्थळी पोहचुन धाड टाकली असता **आरोपी नामे १) खुशाल काशिनाथ उइके, वय २० वर्षे, रा. वार्ड क्र. १३, इंदीरा नगर, नरखेड २) अहमद खान मिया खान, वय ३२ वर्षे, रा. बंगलाचौक वरूड, ता. वरूड ३) पंकज हरीहर कन्हेरे, वय २५ वर्षे, रा. वार्ड क्र ०५, बेलोना ४) प्रफुल चंद्रभान बनाइत, वय २६ वर्षे, रा. वार्ड क्र. १२ नरखेड ५) खुशाल उर्फ शांती काशीनाथ उइके, रा. नरखेड ६) आकाश महाविरसिंग चव्हाण, वय ३२ वर्षे, रा. बेलोंना ७) दिपक शर्मा, रा. वरूड, जि. अमरावती ८) नितीन सेवतकर, रा. पांढुर्णा, ता. पांढुर्णा ९) सागर जत्रे, रा. बेलोना १०) निक्की, रा. नरखेड ११) भुरा उइके, रा. वरूड, जि. अमरावती १२) टिल्लु सरदार, रा. पांढुर्णा १३) योगेश मदनकर, रा. बेलोना १४) राहुल बावने, रा. बेलोना १५) हर्षल घरत, रा. बेलोना १६) कुणाल बरोले, रा. बेलोना आणि १७) गोलु नावाचा आरोपी हे** जुगार खेळत असल्याची माहीती पोलीसांना प्राप्त झाली काही आरोपींना पोलीसांनी जागीच पकडले.

**पोलीसांनी पंचासमक्ष १) एक केटीएम कंपनीची मोटार सायकल क्र. एम एच ४९/बी एल ७१३३ किंमती १०,००००/—रूपये, २) रोख रक्कम १४,०००/—रूपये ३) १२ कॅट ताशपत्ते ४) एक मोबाईल आणि इतर साहीत्य असा एकुण १,२०,६००/—रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. नमुद आरोपीतांविरूध्द पोलीस स्टेशन नरखेड येथे १२ महाराष्ट्र जुगार कायदा अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**

# अवैधरित्या विनापरवाना देशी दारूची वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद,४८ हजार रूपयाचा मुद्देमाल जप्त, पोलीस स्टेशन अरोली यांची कामगिरी

**पोलीस स्टेशन अरोली** :— दिनांक ०७/०४/२०२६ रोजी अरोली पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, मोटरसायकलने **अवैधरीत्या देशी दारूची वाहतुक केली** जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी तात्काळ सरसोली येथे नाकाबंदी केली असता नाकाबंदी दरम्यान होंडा कंपनीची ग्लॅमर मोटर सायकल क्र. एम. एच ४०/ए ए ७०२२ ही मिळुन आली. वाहन थांबवुन वाहनाची पंचासमक्ष पाहणी केली असता देशी दारू मिळुन आली. **आरोपी नामे प्रकाश हरीचंद्र भिवगडे, वय ४२ वर्ष, रा. धर्मापुरी, ता. मौदा, जि. नागपूर हा अवैधरीत्या देशी दारूची वाहतुक करतांना मिळुन आला.**

**पोलीसांनी पंचासमक्ष १) देशी दारूच्या २०० निपा किंमती ८०००/— रूपये, होंडा कंपनीची काळया रंगाची ग्लॅमर क्र. एम. एच ४०/ए ए ७०२२ किंमती ४०,०००/—रूपये असा एकुण किंमती ४८,०००/— रुपयांचा मुददेमाल जप्त केला आहे. नमुद आरोपी विरूध्द पोलीस स्टेशन अरोली येथे महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**

# नागपूर ग्रामीण जिल्हयात अंमली पदार्थाचे सेवन करणाऱ्या आरोपीतांविरूध्द एन.डी.पी.एस कायदयान्वये ०४ गुन्हे नोंद

**दिनांक ०८/०४/२०२६ रोजी नागपुर ग्रामीण जिल्हयात अंमली पदार्थाचे सेवन करणाऱ्या आरोपींवर कारवाई करून ४ गुन्हे नोंद करण्यात आले.**

**काटोल पोलीस स्टेशन अंतर्गत आरोपी क्रं १) नामे रामेश्वर गणेश वाघडकर, रा. ताराबोडी २) संदिप उत्तम वाघाडे, वय ३७ वर्ष, रा. सोनखांब** हे उडान पुलाखाली मौजा कुकडी पांजरा शिवार काटोल येथे सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आले. तसेच **पोलीस स्टेशन खापा** अंतर्गत मौजा कोच्छी फाटा येथे **आरोपी नामे राहूल भोजराज भैसारे, वय ४२ वर्ष, रा. कोच्छी, ता. सावनेर, जि. नागपूर** हा

सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला. **पोलीस स्टेशन मौदा** अंतर्गत मौजा गुजरवाडा येथे आरोपी नामे **मनोज रामचंद्र वर्मा, वय ४९ वर्ष, रा. माळी मोहल्ला मौदा** हा सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला.नमुद आरोपी हे अंमली पदार्थांचे सेवन करतांना मिळुन आल्याने त्यांच्यावर कलम २७ एन.डी.पी.एस. कायदयान्वये प्रत्येकी ०१ असे ०४ गुन्हे नोंद करण्यात आले आहे.

## अस्तित्व लपवुन गुन्हा करण्याच्या उद्देशाने फिरणाऱ्या आरोपीतांविरूध्द ०२ गुन्हे नोंद

**पोलीस स्टेशन कोंढाळी :—** दिनांक ०८/०४/२०२६ रोजी कोंढाळी पोलीस अवैध धंदयावर कारवाई करणेकामी पेट्रोलींग करीत असता सायखोड कोंढाळी परिसरात **आरोपी क्र. १) नामे अरविंद जयदेव राउत, वय २३ वर्ष, रा. चुल्लाड, ता. तुमसर, जि. भंडारा ह. मु. वाघविला, वाघउमरी शिवार २) अतुल श्यामा कांबळे, वय २४ वर्ष, रा. चुल्लाड, ता. तुमसर, जि. भंडारा, ह. मु. वाघविला, वाघउमरी शिवार** हे स्वतःचे **अ**स्तित्व लपवुन सुर्यास्तानंतर आणि सुर्योदयाच्या पुर्वी फिरतांना मिळुन आले. पोलीसांनी त्यांना विचारपुस केली असता त्यांनी उडवा उडवीची उत्तरे दिली. नमुद आरोपी हे दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने वावरतांना मिळुन आल्याने आरोपीतांचे विरूध्द पोलीस स्टेशन कोंढाळी येथे कलम १२२ महाराष्ट्र पोलीस अधिनियम अन्वये ०२ गुन्हे नोंद करण्यात आले आहे.

**मा. पोलीस अधिक्षक**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**
**यांच्या मान्यतेने**